MHLA160004942018

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.९७/२०१८**
**ईसाक वि. जावेद**

-:: **नि.क्र.१ लगत आदेश** ::-

मा. उच्च न्यायालय यांनी दि.०९/०३/२०२६ ते १३/०३/२०२६ पर्यंत फौजदारी प्रकरणाबाबत विशेष मोहीम (Special Drive) आयोजित केलेली आहे. त्याबाबत मा. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण लातूर यांनी पत्र जा.क्र./जि.वी.से.प्रा./३४३/२०२६ तारीख ०७/०३/२०२६ प्रमाणे कळविलेले आहे.

०२. सदर प्रकरण हे पराक्रम्य संलेख अधिनियमाचे कलम १३८ च्या गुन्ह्याकरिता दि.२६/१०/२०१८ रोजी दाखल झाले. त्यानंतर आरोपी नियमित गैरहजर असल्याने दि.२३/१२/२०१९ रोजी त्याच्याविरुध्द गैरजमानती वॉरंट काढला. परंतु तेव्हापासून सदर वॉरंट बजावलेला नाही. फिर्यादीने सदर वॉरंट बजावण्यासाठी परिणामस्वरुपी कार्यवाही केलेली नाही. फिर्यादीने दि.१३/०७/२०२० ते ०२/०३/२०२१ आणि त्यानंतर १९/०४/२०२१ ते ०७/०९/२०२१ पर्यंत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. फिर्यादीचा कसूर स्थापित झाला. फिर्यादी आणि त्यांचे अधिवक्ता हे नियमित गैरहजर आहेत. त्यांनी कार्यवाही करण्यास कसूर केला. प्रकरण फार जुने आहे. ते विनाकारण तहकूब करणे किंवा प्रलंबित ठेवणे अनुचित ठरेल. फिर्यादीच्या कसूरामुळे सदर प्रकरण खारीज होण्यास पात्र आहे. सबब सदर प्रकरण हे विशेष मोहीमेअंतर्गत भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २७९ प्रमाणे बंद करण्यास योग्य आहे. सबब भारतीय नागरिक सुरक्षा संहितचे कलम २७९ प्रमाणे फिर्यादीच्या कसुरामुळे सदर प्रकरण खारीज करण्यात येते व आरोपीला दोषमुक्त करण्यात येते.

०३. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात

MHLA160004942018

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.९७/२०१८**
**ईसाक वि. जावेद**

घोषित केला.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.03.13 18:36:22 +0530

ठिकाण – देवणी ( शरद अ. सुरजुसे )

दिनांक – १३–०३–२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

देवणी.